तरुण भारत
Apla Nagpur | 2022-12-05 | Page- 3
epaper.tarunbharat.net



# सायबर सुरक्षेविषयी शाळांत जनजागृती

◆ **नागपूर, ४ डिसेंबर**

इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शाळांत सायबर सुरक्षेविषयी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्सच्या विद्यार्थिनी समीक्षा चोखांद्रे व वैष्णवी देशमुख यांनी कुर्वेज न्यू मॉडेल पब्लिक स्कूल, सुरेशबाबू धावडे पब्लिक स्कूल, नारायण विद्यालय, निवासी पब्लिक स्कूल आणि पोद्दार इंटरनॅशनल स्कूल येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी माहिती दिली. तसेच सायबर गुन्हापासून कसा बचाव करावे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे संचालक डॉ. रामदास आत्राम, विभाग प्रमुख डॉ. आशिष बढिये, डॉ. नीती कपूर, प्रो. हंसी बन्सल यांचे मार्गदर्शन लाभले. ◄*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments